# उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे यांचे कार्यालय

राष्ट्रसंत अचार्य श्री. पद्मसागर सूरीश्वरजी (भवन) एम.बी.एम.सी.बिल्डींग
शांती गार्डन, रामनगर, मिरारोड (पुर्व) ४०११०७.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

जा.क्र.उपनि/ठाणे ता./बी-५/इंद्रलोक
हौ/कलम ८८/ ४७२० /सन २०१८
दिनांक :- १९/०३/२०१८

वाचावे :- १) संस्थेतील सर्व सदनिका धारक व दुकान धारक यांचे दिनांक ०७/१२/२०१४ राजीचे या कार्यालयास प्राप्त दिनांक ११/०१/२०१६ रोजीचे पत्र.

२) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयें दिनांक ०५/०४/२०१६ रोजीचे आदेश.

३) श्री बी. आर. मगदुम, सेवानिवृत्त, सहाय्यक निबंधक यांचे दिनांक १२/०६/२०१६ रोजीचे या कार्यालयास प्राप्त दिनांक १७/०६/२०१६ रोजीचे पत्र.

४) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये दिनांक २८/०७/२०१६ रोजीचे आदेश.

५) श्री.मगन पाटील, सेवानिवृत्त, सहाय्यक निबंध, चौकशी अधिकारी यांचा दि. २९/११/२०१७ रोजीचा या कार्यालयास दि.११/१२/२०१७ रोजी प्राप्त अहवाल.

६) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे. 3७८८ 23/4/18

---

ज्याअर्थी, इंद्रलोक को-ऑप. हौसिंग सोसा. लि., शांती पार्क, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ९ अन्वये नोदणीकृत गृहनिर्माण संस्था असून सदर संस्था या कार्यालयाचे कार्यकक्षेत कार्यरत आहे, आणि,

ज्याअर्थी, उक्त वाचले क्र. १ अन्वयें इंद्रलोक को-ऑप. हौसिंग सोसा. लि., शांती पार्क, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे या संस्थेंतील सर्व सदनिका धारक व दुकान धारक यांनी या कार्यालयास प्राप्त दिनांक ११/०१/२०१६ रोजी पत्र देऊन संस्थेंच्या सन २००९ ते सन २०१२ मधील फेरलेखापरिक्षण अहवालातील त्रुटी व दोष आरोपाबाबत जुने कार्यकारी कमिटीवर कायदेशीर कारवाई करणेबाबत या कार्यालयास कळविलेले होते. आणि,

ज्याअर्थी, सदरील संस्थेंचे सन २००९-२०१०, सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ या वर्षाचे फेरलेखापरिक्षण श्री अशोक मगर यांनी केलेले असुन, सदर अहवालाची प्रत या कार्यालयास सादर केलेली आहे. त्या अनुषंगाने सदर संस्थेंच्या जुन्या कार्यकारी कमिटीवर ताबोडतोब योग्य ती कडक कारवाई करावी असे या कार्यालयास विनंती करण्यात आलेली होती. सदर बाबत उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने या कार्यालयाने उक्त वाचले क्र. २ अन्वयें महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयें खाली चौकशी करणेकरिता दिनांक ०५/०४/२०१६ रोजी आदेश पारीत करुन श्री बी. आर. मगदुम, सेवानिवृत्त, सहाय्यक निबंधक यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. परंतु उक्त वाचले क्र. ३ अन्वयें श्री बी. आर. मगदुम, सेवानिवृत्त, सहाय्यक निबंधक तथा चौकशी अधिकारी यांनी या कार्यालयात दिनांक १७/०६/२०१६ रोजी पत्र देऊन सदर चौकशी कामी असमर्थता दर्शविली आहे. आणि,

ज्याअर्थी, सदर बाबत या कार्यालयाने उक्त वाचले क्र. ४ अन्वयें महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयें दिनांक २८/०७/२०१६ रोजी आदेश पारीत करुन श्री बी. आर. मगदुम, सेवानिवृत्त, सहाय्यक निबंधक यांचेऐवजी श्री.मगन पाटील, सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली होती. सदर आदेशास अनुसरुन उक्त वाचले क्र. ५ अन्वयें श्री.मगन पाटील, सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक यांनी चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या कलम ८३ च्या अहवालाची छाननी केली असता, सदर अहवालामध्ये संस्थेंचे तत्कालीन पदाधिकारी अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांनी चौकशी मुद्दयावर लिखीत खुलासा सादर केला आहे तरी तो ग्राहय धरण्यास योग्य वाटत नाही असे नमुद केले आहे. तसेच तक्रारदार तत्कालीन समिती सदस्य श्री.गोपालकृष्ण गानिगा आणि श्री.निलेश गांधी यांनी काही व्हौचर्स व बीलांच्या झेरॉक्स प्रती, बँक बचत खात्याचा अर्धवट खाते उतारा, लेखापरीक्षकांच्या खुलासा मागणी पत्र इत्यादी

Scanned by CamScanner

# -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, दिनेश चंदेल, उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे असा आदेश देत आहे की, इंद्रलोक को-ऑप. हौसिंग सोसा. लि., शांती पार्क, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे या संस्थेच्या गैरव्यवहाराची व जबाबदारी निश्चित करण्यासाठी परिशिष्ट "अ" प्रमाणे श्री. विनायक आर. साखरे, सेवानिवृत्त विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण)तथा प्राधिकृत चौकशी अधिकारी यांची कलम ८८ खाली प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

त्यांनी चौकशी करुन तीन महिन्यांचे आंत चौकशी अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश माझे आज दिनांक २२/०१/२०१८ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह देत आहे.

उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे तालुका यांचे कार्यालय ठाणे तालुका सत्यमेव जयते

(दिनेश चंदेल)
उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे

ठिकाण :-मिरारोड
दिनांक :- १९/०३/२०१८

प्रति,

१) श्री. श्री. विनायक आर. साखरे, सेवानिवृत्त विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण)तथा प्राधिकृत चौकशी अधिकारी, इंद्रलोक को-ऑप. हौसिंग सोसा. लि., शांती पार्क, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे.

२) चेअरमन /सेक्रेटरी, इंद्रलोक को-ऑप. हौसिंग सोसा. लि., शांती पार्क, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे.

२/- त्यांना सूचित करण्यांत येते की, चौकशी कामी संस्थेचे संपूर्ण दप्तर व आवश्यक सर्व रेकॉर्ड प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना उपलब्ध करून द्यावे. अन्यथा चौकशी कामी दप्तर प्राप्त करणेसाठी कलम ८० अन्वये कार्यवाही करणेत येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

तसेच चौकशी कामी रुपये २०,०००/- चौकशी शुल्कचा धनादेश मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे याचे खाती १५ दिवसांत जमा करावा. चौकशी शुल्क मुदतीत जमा न केल्यास सदर रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करणेचा अधिकार निबंधकास आहे, याची ही संस्थेने नोंद घ्यावी.

**त माहितीसाठी सविनय सादर.**

) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई.
मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे.

उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे.

Scanned by CamScanner